Exh.29

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर न्यायालय नेवासा जि. अहमदनगर**

**आर.सी.एस. नं.२८३/२०२४**

**सौ. मनिषा संजय पेहरे व इतर**

**विरुध्द**

**सुखदेव खंडेराव क्षीरसागर व इतर**

---

प्रकरण :- **डिक्लेरेशन, वाटणी व कायमच्या मनाई हुकूमाबाबत.**

विषय :- **ऑर्डर ३९ रुल १ व २सहकलम १५१ सिपीसी प्रमाणे**

---

**महोदय,**

**वादींतर्फे निशाणी ५ चे अर्जावर लेखी युक्तीवाद पुढील प्रमाणे,**

वादींनी प्रतिवादींविरुध्द डिक्लेरेशन, वाटणी व कायमच्या मनाई हुकूमासाठी मुळ दावा सादर केलेला असुन त्यावर विचार विनिमय होऊन अंतिम निर्णय येण्यास बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात दावा प्रलंबित असल्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र.१, ८ ते १३ हे वादींच्या हक्कांना शह देण्यासाठी संगणमताने दावा मिळकतीच्या मालकी हक्कात फेरबदल करु शकतात, त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करणे आवश्यक झाले आहे.

Read & Recorded
Jt CJJD
13/01/2026

१) **दावा मिळकतींचे वर्णन** :- मौजे तरवडी ता. नेवासा जि. अहमदनगर शिवारातील वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या वडीलोपार्जीत व अविभक्त हिंदु कुटूंबातील शेत जमिनी ज्यांचे वर्णन पुढील प्रमाणे,

अ) **गट क्र.९०, एकुण क्षेत्रफळ ०.६१ आर.**, आकारणी रु.२.३५ पै. जिच्या चतुःसिमा, **पुर्वेस** – पांडुरंग वडगे यांची जमिन, **पश्चिमेस** – पांडुरंग वडगे यांची जमिन, **उत्तरेस** - सामाईक विहीर व रस्ता आणि **दक्षिणेस** - अशोक क्षीरसागर यांची जमिन.

ब) **गट क्र.९३, एकुण क्षेत्रफळ १ हे. ३३ आर.**, आकारणी रु.३.५० पै. जिच्या चतुःसिमा, **पुर्वेस** – गाडी रस्ता, **पश्चिमेस** – ओढा, **उत्तरेस** – कारभारी क्षीरसागर यांची जमिन, आणि **दक्षिणेस** - सामाईक विहीर व रस्ता.

क) **गट क्र.९६, एकुण क्षेत्रफळ १ हे. ८३ आर.**, पोटखराबा ०१ आर., आकारणी रु.१.२० पै. जिच्या चतुःसिमा, **पुर्वेस** – ओढा, **पश्चिमेस** –

शिवरस्ता, **उत्तरेस** – वडगे यांची जमिन, आणि **दक्षिणेस** – पार्वताबाई कारभारी क्षीरसागर यांची जमिन,

**(ज्यातील तदंगभुत वस्तुंसह खाली काहीएक राखुन न ठेवता, ज्यास यानंतर "दावा मिळकती" असे संबोधण्यात आले आहे.)**

२) वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ ह्या आपसांत नात्याने सख्ख्या बहिणी असुन प्रतिवादी क्र.१ हे त्यासर्वांचे वडील आहेत. प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी आणि वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांची आई नामे ताराबाई ह्या दिनांक ११/०१/२०२३ रोजी मयत झालेल्या असुन प्रतिवादी क्र.६ व ७ हे वादींची पुर्वमयत बहिण नामे अनिता विजय खराडे यांची अपत्ये आहेत. अनिता हिचे मृत्युनंतर तिचे पति विजय यांनी प्रतिवादी क्र.६ व ७ यांचे पालन पोषणासाठी वादी क्र.२ सरिता हिच्याशी विवाह केलेला आहे. सर्व वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ या विवाहानंतर त्यांचे सासरी नांदत आहेत.

३) प्रतिवादी क्र.८ व १० हे वादींचे चुलत भाऊ असुन प्रतिवादी क्र.९ ही प्रतिवादी क्र.८ ची पत्नी आहे. त्याच प्रमाणे प्रतिवादी क्र.९ व १० यांनी दावा गट क्र.९६ मधील मिळकतीचे बेकायदेशीर गहाणखत प्रतिवादी क्र.११ यांचे हक्कात करुन दिलेले असुन त्याविषयी देखील प्रतिवादी क्र.८ ते १० यांच्या विरुध्द दाद मागितलेली असल्याने आणि प्रतिवादी क्र.११ यांची उपस्थिती या प्रकरणात गरजेची असल्याने त्यांना देखील या प्रकरणात आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट केलेले आहे.

४) संपुर्ण दावा मिळकती ह्या वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्या अविभक्त हिंदु कुटूंबाच्या वडीलोपार्जीत मिळकती असुन त्यामध्ये अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही.

५) दावा मिळकत १-अ गट क्र.९० आणि दावा मिळकत १-क गट क्र.९६ मधील संपुर्ण दावा मिळकत पुर्वी वादींचे चुलते नामदेव खंडेराव क्षीरसागर यांचे नावे कौटुंबिक सोईसाठी नमुद करण्यात आलेली होती, मात्र कालांतराने नामदेव आणि

प्रतिवादी क्र.१ सुखदेव यांच्यात वाटप होऊन वर नमुद दोन्ही दावा मिळकती प्रतिवादी क्र.१ यांचे नावे महसुली अभिलेखामध्ये नमुद झाल्या होत्या.

त्याच प्रमाणे दावा मिळकत १-ब गट क्र. ९३ मधील १ हे. ३३ आर. शेत जमिन ही प्रतिवादी क्र.१ आणि गणपत शंकर क्षीरसागर यांचे दरम्यान झालेल्या वाटपाद्वारे प्रत्यक्ष जंगल वहिवाटीवरुन प्रतिवादी क्र.१ यांचे हिश्यास देण्यात आली होती. यावरुन तिनही दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्या अविभक्त हिंदु कुटूंबाच्या वडीलोपार्जीत मिळकती झालेल्या असुन त्यामध्ये वादींची सहहिस्सेदारी आहे.

६) वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे एकमेकांशी चांगले संबंध होते मात्र वादींची आई ताराबाई या जानेवारी २०२३ मध्ये मयत झाल्यानंतर एप्रिल २०२३ पासुन प्रतिवादी क्र.८ ते १० यांचा प्रतिवादी क्र.१ यांच्याशी संपर्क वाढला व त्यांनी प्रतिवादी क्र.१ यास पुर्णतः नियंत्रीत करण्यास सुरुवात केली, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी हळुहळु वादींशी व अन्य मुलींशी संपर्क कमी केला असता वादींनी त्या मागचे कारण शोधण्याचा बराच प्रयत्न केला तेव्हा प्रतिवादी क्र.८ ते १० यांचा दावा मिळकतींविषयी दुषित हेतु असुन ते प्रतिवादी क्र.१ यांची दिशाभुल करुन दावा मिळकती बळकविण्याच्या प्रयत्नात असल्याचे कळाले, तेव्हा वादी व प्रतिवादी क्र.१ आणि प्रतिवादी क्र.८ ते १० यांच्या नात्यामध्ये कटुता निर्माण झाली.

७) नोव्हेंबर २०२३ चे शेवटच्या आठवड्यामध्ये प्रतिवादी क्र.१, ८ व ९ हे दावा मिळकती त्यांच्या नावे झालेल्या असल्याचा गैरफायदा घेऊन विक्रीच्या प्रयत्नात असल्याचे वादींना खात्रीलायकरित्या समजले असता वादींनी दिनांक ०१/१२/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ यांची त्यांच्या राहत्या घरी भेट घेऊन दावा मिळकतींमधील त्यांचा हिस्सा वाटुन व विभागुन मागितला असता प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीसंबंधी कागदपत्रे वादींच्या अंगावर फेकुन “या जमिनींशी तुमचा काहीही संबंध राहिलेला नाही, मी तुम्हाला एक गुंठा सुध्दा देणार नाही” अशी धमकी देऊन दावा मिळकतींमधील हिस्सा वाटुन देण्यास नकार दिला. त्यावेळी प्रतिवादी क्र.१ ने फेकलेली कागदपत्रे वादींनी जमा करुन काळजीपुर्वक पाहिली असता प्रतिवादी क्र.१ व मयत ताराबाई यांनी प्रतिवादी क्र.८ यास त्याचे सज्ञानपणी दत्तक घेतलेले असल्याचा दत्तकपत्राचा दस्त तसेच प्रतिवादी क्र.९ ते ११ यांच्यामधील नजर

गहाणखताचा दस्त आणि प्रतिवादी क्र.१, मयत ताराबाई, प्रतिवादी क्र.८ व ९ यांच्यात झालेल्या कथीत वाटपाआधारे तहसिलदार नेवासा यांनी दिलेल्या आदेशाबाबत दिनांक ०१/१२/२०२३ रोजी प्रथमतः माहिती होऊन वाटपाचा दावा आणि निशाणी ५ खालील अर्ज दाखल करण्यास कारण घडुन आले असुन नित्य घडत आहे.

८) वर नमुद परिच्छेदातील कागदपत्रांमध्ये वादींना आढळुन आले की प्रतिवादी क्र.८ हा सज्ञान असतांना आणि दिनांक ३०/०३/२००७ रोजी त्याने वयाचे २५ वर्ष पुर्ण केलेले असतांना त्याच प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व मयत ताराबाई हे जोडपे अपत्यहीन नसतांना केवळ दावा मिळकती बळकाविण्यासाठी प्रतिवादी क्र.८ ने प्रतिवादी क्र.१ व मयत ताराबाई यांची दिशाभुल करुन नोंदणीकृत दत्तकपत्र क्र.९६९/२००७ करुन घेतले. कथीत दत्तकपत्राचे वेळी प्रतिवादी क्र.८ हा सज्ञान असल्याकारणाने तसेच वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ ह्या मुली असतांनाही त्या दत्तकपत्रामध्ये "तुम्हास मुलबाळ नाही व तुमचा वंश पुढे चालवावा" अशी खोटी विधाने करुन तो दस्त तयार केलेला असल्याने तो वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करुन मिळण्यासाठी देखील दिनांक ०१/१२/२०२३ रोजी कारण घडले आहे व नित्य घडत आहे.

त्याच प्रमाणे त्याच वेळी नोंदणीकृत नजर गहाणखत क्र.४२११/२०१८ हे देखील वादींच्या निदर्शनास आल्याने त्याचे अवलोकन केले असता दावा मिळकत १-क मधील १ हे. ४० आर. बाबत प्रतिवादी क्र.९ ने प्रतिवादी क्र.१० चे सहकार्याने प्रतिवादी क्र.११ चे हक्कात करुन दिलेले नजर गहाणखत वादींच्या संमतीशिवाय केलेले असल्याने ते देखील वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करुन मिळण्यास दिनांक ०१/१२/२०२३ रोजी कारण घडले आहे व नित्य घडत आहे.

९) दावा मिळकतींसंबंधी वर नमुद कागदपत्रे बघीतल्यानंतर वादींनी दिनांक ०६/१२/२०२३ रोजी दावा मिळकतींचे फेरफार मिळविले असता तहसिलदार नेवासा यांचे आदेशाद्वारे संबंधीत तलाठी यांनी कोणतेही कायदेशीर प्रक्रीयेचे पालन न करता आणि वादींच्या संमतीशिवाय फेरफार क्र.४७९७ ची नोंद घेऊन दावा गट क्र.९३ मधील संपुर्ण मिळकत प्रतिवादी क्र.८ संदिप याचे नावे, दावा गट क्र.९६ मधील १ हे. ४० आर. ळिकत प्रतिवादी क्र.९ योगिता हिचे नावे तर याच गटातील ४३ आर.

मिळकत वादींची आई मयत ताराबाई यांच्या नावे केल्याचे निदर्शनास आले असुन तो फेरफार वादींना मान्य नसल्याने तो फेर क्र.४७९७ हा वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करुन मिळणे आवश्यक आहे.

१०) वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्यामध्ये वडीलोपार्जीत मिळकतींच्या वाटपाबाबत वाद निर्माण झाल्याचे प्रतिवादी क्र.८ व ९ यांचे लक्षात आले असता त्यांनी वादींच्या हक्कांना शह देण्यासाठी त्यांच्या नावावरील दावा मिळकती विक्री काढल्या असुन त्याबाबत कोणतेही खरेदी-विक्रीचे दस्त नोंदवु नये म्हणुन वादींनी दुय्यम निबधंक नेवासा यांच्याकडे आणि दावा मिळकतीसंबंधी यानंतर कोणतेही फेरफार नोंदवु नये म्हणुन तलाठी सजा कुकाणा यांच्याकडे दिनांक ०७/१२/२०२३ पासुन ते आजपावेतो वेळोवेळी विनंती करुनही त्यांनी वादींकडे सक्षम दिवाणी न्यायालयाच्या मनाई आदेशाची मागणी केली. शेवटी दिनांक २०/०३/२०२४ रोजी वादींनी प्रतिवादी क्र.१, ८ व ९ यांच्याकडे दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा मागितला असता त्यास नकार मिळाल्यावरुन वादींना दावा आणि निशाणी ५ खालील अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे व नित्य घडत आहे.

११) तिनही दावा मिळकतींमध्ये वादींचा अविभाज्य हिस्सा असुन वादींना जन्मतःच त्या मिळकतींमध्ये सहहिस्सेदार या नात्याने हक्क प्राप्ती झालेली आहे. त्याच प्रमाणे प्रतिवादी क्र.८ हा वादींचा भाऊ नसुन केवळ दावा मिळकतींवर दुषित नजर ठेवून प्रतिवादी क्र.८ याने स्वतःचे हक्कात दस्त व आदेश करवुन घेऊन दावा मिळकत बळकविण्याचा प्रयत्न चालविलेला असल्याने वादींचे दावा मिळकतींवरील हक्क व हितसंबंध धोक्यात आलेले आहे. यापुर्वी आजपावेतो वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्यामध्ये दावा मिळकतींचे सरस निरस वाटप झालेले नसल्याची बाब विचारात घेता वादींचा अर्ज विनंती प्रमाणे मंजुर करुन त्यांना दावा मिळकतींमधील त्यांचा हिस्सा वाटुन विभागुन स्वतंत्र ताब्यात मिळणे गरजेचे व आवश्यक आहे. त्याच प्रमाणे त्यांचे हिश्यात अडसर ठरणारे दत्तकपत्र, नजर गहाणखत व तहसिलदार यांचे आदेश वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करुन मिळणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे वादींना त्यांचा हिस्सा वाटुन प्रत्यक्ष ताब्यात मिळेपावेतो प्रतिवादी क्र.१, ८, ९ ते ११ यांनी दावा मिळकतींचे मालकी हक्कात कोणताही फेरबदल करु नये म्हणुन मनाई हुकूम मिळणे गरजेचे आहे.

तसे न झाल्यास या वादींचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होऊन त्यांना दावा मिळकतींमधील त्यांचा हक्क व हितसंबंध गमवावा लागेल म्हणुन वादींचा अर्ज विनंती प्रमाणे मंजुर होणे आवश्यक आहे.

१२) वादींची वादकथने, दाखल कागदपत्रे आणि उदभवलेली परिस्थिती विचारात घेता वादींनी प्रथमदर्शनी आपले प्रकरण सिध्द केलेले आहे. या पार्श्वभुमीवर प्रतिवादी क्र.८ याने प्रतिवादी क्र.९ शी संगणमत करुन दावा मिळकती हडप करण्याचा प्रयत्न चालविलेला असल्याचे सिध्द होत असल्याने आणि दावा मिळकतींमधील वादींचा हिस्सा अद्यापपावेतो वाटुन मिळालेला नसल्याने दाव्याचा संपुर्ण समतोल वादींच्या बाजुने आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१, ८ ते ११ यांना दावा मिळकतींच्या मालकी हक्कात फेरबदल करण्यापासुन आणि त्या मिळकतींवर कर्जबोझा निर्माण करण्यापासुन वेळीच रोखण्याकरीता अर्ज विनंती प्रमाणे मंजुर होणे आवश्यक आहे, अन्यथा या वादींचे पैशांच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. म्हणुन वादींचा अर्ज खर्चासहीत मंजुर करण्यात यावा व मुळ दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र.८ व ९ यांनी स्वतः अथवा त्यांचे नौकर, चाकर, हस्तक, प्रतिनिधी, कुटूंबीय ईत्यादींमार्फत दावा मिळकतींवरील वादींच्या ताब्यात हरकत अडीअडथळा करु नये, **तसेच** प्रतिवादी क्र.१, ८ ते ११ यांनी दावा मिळकतींचे मालकी हक्कात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करु नये तसेच त्यावर कर्जबोझा निर्माण करु नये म्हणुन तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश पारीत करण्यात यावा. करीता हा लेखी युक्तीवाद.

**दिनांक १३/०१/२०२६**

वादींतर्फे

**ॲड. व्ही.ई. शिंदे**

**ॲड. डि.के. तारु**